— प्रेस नोट —

जा.क्र. विशा /प्रेसनोट/2232/२०१९
पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर.
दिनांक — ०३/०९/२०१९

- अमरावती पोलीस आयुक्तालयाचेवतीने पोलीस आयुक्तालय स्तरावर सर्वोत्तम गणेश मंडळ बक्षिस स्पर्धा — २०१९ चे आयोजन केले असुन सदरच्या स्पर्धेमध्ये सर्व गणपती मंडळ सहभागी होऊ शकतात. त्यामध्ये खालील बाबींची पाहणी करण्यात येणार आहे.

१. **देखावा** :— सजावट, सुशोभिकरण, मुर्ती, जनतेचा सहभाग, पर्यावरणाचा संदेशाचा समावेश असलेला देखावा, सादर करण्याचा प्रतिसाद देखाव्यातुन प्राप्त संदेश.

२. **जातीय सलोखा** :— सामाजिक प्रश्नांची मांडणी, गणेशोत्सव मंडळाच्या कार्यक्रमातुन मिळणारा संदेश, सर्व धर्म समभावास चालना देणारा उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, रोड शो स्पर्धा, भाषण, मिरवणुकी दरम्यान समाज प्रबोधनाचे उपक्रम, पारंपारिक वाद्यांचा वापर व पारंपारिक नृत्य, लोकांचा प्रतिसाद.

३. **सर्वनियमांचे पालन करणारे आदर्श गणेश मंडळ**:— वर्गणी जमा करण्याची पध्दत, मुर्तीची सुरक्षितता, संबंधीत विभागाची परवानगी, नियमानुसार वाद्यांचा वापर, मंडळाची शिस्त, नागरिकांच्या सुरक्षिततेची व्यवस्था.

४. **उत्कृष्ट व आदर्श सुरक्षाव्यवस्था** :— सी.सी.टि.व्ही. कॅमेरा व्यवस्था, देखावा पाहण्यासाठी येण्याचे व जाण्याचे मार्ग विद्युत पुरवठा, रहदारीस अडथळा होणार नाही यादृष्टीने केलेली मंडपाची उभारणी, नागरिकांसाठी सुचना फलके, ध्वनी प्रदुषण होणार नाही याबाबत उपाययोजना.

५. **शिस्तबध्द मिरवणुक** :—मिरवणुकीकरिता उपयोगात आणलेल्या वाहनांचा वापर करतांना पाळलेले नियम, नियमानुसार वाद्यांचा वापर, स्वंयसेवकांची शिस्त, मिरवणुकीदरम्यान वाहतुक नियमांचे पालन, मिरवणुकीदरम्यान प्राण्यांचा वापर न करणे? मिरवणुक चांगल्या प्रकारे पार पाडुन मुर्तीचे विर्सजन.

- वरील विषयावर स्पर्धा घेण्यात येणार असुन बक्षिस मुल्यमापन समितीच्या मार्फतीने तपासणी केलेनंतर पहिले ०३ गणेश मंडळाला बक्षिस देण्यात येणार आहे. तसेच विशेष प्रोत्साहनपर ०४ व प्रोत्साहनपर ०७ बक्षिसे देण्यात येणार आहेत.

- तरी जास्तीत जास्त मंडळानी सदर स्पर्धेत भाग घ्यावा असे आवाहन पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी केले आहे. सदर स्पर्धेमध्ये भाग घेणा—या मंडळांनी विशेष शाखा पोलीस पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथे संपर्क साधावा.

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

पोलीस आयुक्त अमरावती
करीता

Scanned by CamScanner